# प्रकरण पाचवे

## उपसंहार :

'करमणूक' मध्ये 'स्फुट गोष्टी' लिहून हरिभाऊ आपटे यांनी मराठी कथेचा पाया घालण्याचे महान कार्य केले. तर मराठी कथेला नवकथेचा कळस घालण्याचे कार्य गाडगीळ, भावे, गोखले, माडगूळकर यांनी केले. १९६० नंतर मराठी कथा पूर्णांगाने बहरून गेली. या काळात नव्या दमाने, नव्या जाणिवेने स्त्री कथा लेखिका पुढे आल्या. त्यामध्ये वसुधा पाटील यांचा विशेषत्वाने उल्लेख करावा लागेल. एक दमदार व कसदार कथालेखिका असूनही मराठी समीक्षेने त्यांची योग्य ती दखल घेतलेली दिसत नाही म्हणून 'जमूना के तीर' आणि 'वेगळी' या दोन कथा संग्रहांचा परामर्श या लघु प्रबंधिकेव्दारे करण्याचा हा प्रयत्न आहे. पाच प्रकरणात याचे वर्गीकरण केलेले आहे.

२१ व्या शतकाकडे वाटचाल करत असताना कथा वाड.मयात अनेक प्रवाह निर्माण झाले आहेत. ग्रामीण, दलितनागर यांच्या बरोबरीने स्त्रीवादी साहित्यही उभे राहिले आहे. कथा हा वाड्.मयप्रकार सर्वश्रेष्ठ म्हणून गणला गेला आहे. मराठी कथेचा उगम, व्याख्या, विकास व विस्तार, नवकथा व स्त्रीकथालेखन व वेगळेपण यांचा अभ्यास पहिल्या प्रकरणात केला आहे. कथा म्हणजे काय हे सांगून कथेच्या व्याख्या सांगितल्या आहेत. १८९० साली हरिभाऊंनी 'करमणूक' मध्ये स्फुट गोष्टी लिहून अर्वाचीन मराठी कथेचा पाया घातला. हरिभाऊंच्या नंतर वि. सी. गुर्जरांनी मराठी कथेला एक वेगळे वळण लावले. ख-या अर्थाने मराठी लघुकथा आशय संपन्न व स्वतंत्र व्यक्तिमत्वाची करण्याचे कार्य फडके, खांडेकर, य. गो. जोशी, दिवाकर कृष्ण या नामवंत कथाकारांनी केले. फडकेनी कथेला तंत्रशुध्दता, रेखिवपणा व सफाईदार भाषा दिली. खांडेकरांनी मराठी कथेला जीवन सन्मुख बनविली. माटेंनी उपेक्षित माणसाचे जीवन ग्रामीण भाषेत मांडून कथेला महत्वपूर्ण बनविले.

१९४५ च्या सुमारास मराठी कथेत नवतेचे प्रदर्शन झाले. गंगाधर गाडगीळ, भावे, गोखले, या नवकथेच्या शिल्पकारांनी व्यक्तीचे ' ध्र' किरणात्मक चित्रण केले. माणसाच्या अंतर्मनाचा वेध घेतला नवकथेत व्यक्ती हेच कथाकारांच्या कथालेखनाचे केंद्र बनले आणि व्यक्तीच्या संदर्भात सामाजिक जाणिवा व जीवनातील मूल्य रंगविली गेली. १९४५ नंतरची नवकथा लघु-कथेच्या विकास संक्रमणातील अत्यंत भूषणावह ठरली.

' करमणूक ' व ' मनोरंजन ' काळात क्वचित स्त्रियांनी लेखन केले. १८९९ पासून स्त्रियांचे कथालेखन सुरु आहे. त्यांच्या कथांचा संग्रह प्रसिध्द होण्यासाठी १९१५ साल उजाडले. ' शांताबाई ' या लेखिकेने लिहिलेली ' बिचारी आनंदीबाई ' ही पहिली कथा होय. कुटुंबात ज्या परंपरागत समजुती व अंधश्रध्दांचे वर्चस्व होते. तेच त्यांच्या कथेतून अवतरत होते. नवकथा उदयाच्या काळात अनेक स्त्रियानी लेखन केलेले आढळते. स्त्रियांचे अनुभव स्त्रियाच मांडू शकतात असा आत्मविश्वास आल्यावर कमल देसाई, सरिता पदकी व यानंतरच्या पिढीतील विजया राजाध्यक्ष, सुधा नरवणे , वसुधा पाटील यांचे लेखन महत्वपूर्ण वाटते. एकंदर स्त्रियांच्या कथालेखनाचा परामर्श घेता स्त्री कथालेखिकांनी उचललेले पाऊल कौतुकास्पद असेच आहे. याचा आढावा ' मराठी कथेतील वाटचाल ' या पहिल्या प्रकरणात घेतला आहे.

' वसुधा पाटील यांच्या कथेची जडण - घडण ' या दुस-या प्रकरणात वसुधा पाटील यांना लहानपणापासून कथालेखनासाठी ज्या प्रेरणा मिळाल्या त्याचा परामर्श घेतला असून त्यांचा परिचय, शिक्षण, साहित्यसंपदा घेतली आहे. विजय तेंडूलकरांसारख्या श्रेष्टकलावंतामुळे त्यांच्या लेखनाला एक नवी प्रेरणा मिळाली. १९६० नंतर आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही दृष्टीने मराठी कथेला नवे परिमाण मिळवून देण्यात वसुधा पाटील यांच्या कथेचा मोलाचा वाटा आहे. १९६० ते १९८० या कालखंडात घडलेली

त्यांची कथा जुने मानदंड झुगारून नव्या विचारांचे लेणे पांघरते. त्यांच्या कथेला एक नवा घाट आहे. त्यांच्या कथेने नवी आशा निर्माण केली आहे. कथा, कादंबरी, एकांकीका, बालवाङ्मय, नाटयछटा अशा विविध स्वरूपाचे लेखन त्यांनी केले आहे. त्याना कथालेखनास मिळालेली प्रेरणा ही एका जातीवंत, प्रतिभावंत लेखिकेची आहे.

प्रबंधिकेतील " श्रीमती वसुधा पाटील यांच्या कथालेखनाची वैशिष्टये " हे तिसरे प्रकरण होय. सामाजिक कथा, कौटुंबिक कथा, प्रेमकथा, बालमनावर प्रकाश टाकणा-या कथा व इतर स्फुट कथा असे त्यांच्या कथांचे वर्गीकरण केले आहे.

अनेक सामाजिक समस्यांचा प्रश्न त्यांच्या कथांना आहे. सामाजिक समस्यांची गुंतागुंत त्यांच्या अनेक कथेतून जाणवते. स्त्रियांचे अनेक प्रश्न, समस्या तिच्या पीडा, तिच्या जीवनातील घडामोडी, स्त्री मध्ये निर्माण झालेल्या नव्या जाणिवा यांचे चित्रण त्यांनी आपल्या कथेतून केले आहे. परित्यक्त स्त्री मनाच्या भावना व तिच्या समस्या, नव-याच्या अपमानामुळे घर सोडावे लागणा-या मानिनीचे चित्रण, त्याचबरोबर विधवा स्त्रीचा प्रश्न हुंडाबळी स्त्रीची करुण कहाणी, बांझपणा, मुलींना दाखविण्याची जुनी रूढी परंपरा, पुरुष संस्कृतीबद्दल संताप, अशा अनेक प्रश्नांना वाचा फोडण्याचे कार्य वसुधा पाटील आपल्या कथेतून करतात. एकत्र कुटुंब पध्दतीचे फायदे कुटुंबातील सोशिक स्त्रिया सवतीच्या मुलींनाही स्वत:च्या मुलीप्रमाणे प्रेम देणा-या उदात्त स्त्रिया पती - पत्नी यांच्यातील रूसवे - फुगवे यांचे कौटुंबिक जीवनातील चित्रण वसुधा पाटील यांनी अत्यंत सहजपणे व घरगुती वातावरणातून साकार केले आहे. जन्मोजन्मी प्रियकराची वाट व पाहणा-या मनस्वी तरुणी, बदफैली बनून प्रेयसीला नकार देणारे तरूण, प्रीतीच्या बळावर हयात काढणा-या स्त्रिया आणि ... प्रेम विरहाने व्याकूळ झालेले व मिलनासाठी आतूर झालेले स्त्री-पुरुष वसुधा पाटील यांनी आपल्या कथेतून हृदयस्पर्शी संभाषणाव्दारे रंगविले आहे. श्रीनिवासचे अनाथ व पोरकेपण आणि ' भिंती '

मधला जातीयवाद मोडून काढणारा ज्युलियाचा प्रेमविवाह त्यांनी प्रगट केला आहे. त्यांच्या कथेतील स्त्रिया जुन्या रूढी, परंपरा यांना झुगारून स्वत:च्या पायावर उभ्या राहतांना प्रसंगी टक्के-टोणपे खातांना दिसतात.

'व्यक्तिचित्रण' या चौथ्या प्रकरणात स्त्रिव्यक्ति चित्रण, पुरुष व्यक्तिचित्रण, भाषाशैली, वसुधा पाटील यांच्या कथांचे वेगळेपण अशी मांडणी केली आहे. त्यांच्या कथेतील पात्रे जीवनाला घाबरून न जाता नव्या जोमाने जीवनाला सामोरी जातात. नवा आशावाद ठेवतात. घटनांचा आधार घेऊनही त्यांच्या पात्रांची मानसिक आंदोलने किती समर्थपणे टिपता येतात. याचा प्रत्यय -'स्त्री', 'पुरुष' सारख्या कथेतून येतो. त्यांच्या कथा प्राय: व्यक्तिप्रधान व नायिकाप्रधान आहेत. त्यांना घटनांपेक्षा व्यक्तित रस आहे. त्यांच्या कथेतील व्यक्ती सोशिक निग्रही, मनस्वी, अनाथ, पोरक्या, कर्तबगार, बदफैली, कलंदर असून, त्यांची मनू जोडीदाराला पारखण्यासाठी त्याच्याबरोबर सहा महिने राहून पाहते. स्वत:चा प्रश्न स्वत: सोडविण्याची तिची खंबीर वृत्ती आहे. 'अकाली मोहोर' या कथेतील आई नियतीशी झुंज देते आहे. आणि त्या झुंजीत न पाहण्यासारखा तिचा संताप व्यक्त होतो. 'वेगळी' कथेतील ललिता घाटगेला साधा चारचौघीसारखा चिमणीच्या घरट्यातला संसार करणे तिला आवडत नाही. 'मानिनी' कथेतील स्त्री शून्य मनाने ग्रासलेली, रित्या घराने मिळायला घेतलेली, एक अनाथ पराजित स्त्री आहे. संसार करण्यासाठी नव्हे तर मुलाची आई होण्यासाठी त्याच्याशी पुन्हा लग्न करायला तयार होणारी ही स्त्री विलक्षणच। 'आनंदवन' मध्ये दुर्दैवी आनंदी भेटते. 'माझे भोग मलाच भोगले पाहिजेत' हेच तिचे म्हणणे आहे. 'सुचेता' कथेतील अजितवर प्रेम करणारी सुचेता तो आपल्याशी लग्न करील या आशेवर वाट पाहत असते. 'पण या जन्मी नाही आला तरी पुढच्या जन्मी तो आपल्याला भेटावा म्हणून पुण्यकृत्य करीत राहीन अशी तिची जिद्द होती. जीवनाविषयी कांही निश्चित कल्पना बाळगणारी

सरला ' कस्तुरबा ' मध्ये आहे. शरीर विक्रय करणारी गिरिजा पौरुष हरवलेल्या पुरुषोत्तमाचे दु:ख दूर करतांना ' जमुना के तीर ' मध्ये आढळते. आपल्या विधवा बहिणीकडे आपल्या नवऱ्याला पाठविणारी उदात्त इंदिरा ' स्त्री ' मध्ये आहे. स्वत:कडे आकर्षण, मनोवेधक, कांही नसतांना मोठया आकांक्षा ठेवून वेगळ्याच व्यक्तित्वात गुरफटून गेलेली एक निग्रही स्त्री ' अपेशी ' कथेत आहे. मान, स्वाभिमान गुंडाळून ठेवून चहाचा ट्रे घेऊन नवरदेवासमोर लाचारीने उभं राहणारी दीपा ' शॉर्टकट ' कथेत आहे. ' टेकडया ! डोंगराएवढया ' या कथेतील तिन्ही स्त्रिया एकाच पुरुषाच्या जीवनाशी बांधलेल्या ! पतीने भोगून सोडलेल्या अभागी स्त्रिया आहेत. अनाथ व पोरका श्रीनिवास ' श्रीनिवास पानसेचे अंगण ' कथेत आहे. फोटोग्राफीच्या वेडाने पछाडलेला एक कलंदर पारशी म्हणजे जहांगीर ' गानेवाला पंछी ' कथेमध्ये आहे.

वसुधा पाटील यांची भाषाशैली दिलदार, खानदाणी अंत:करणाची आहे. ती कुलवान असून अत्यंत संस्कारित आहे. स्त्री सुलभ व मनोविश्लेषणात्मक आहे. अलंकाराने ती बोजड झालेली नाही. घरगुती पात्रांच्या स्वभावाशी सुसंगत अशा संभाषणाने तिची माधुरी वाढली आहे. शेवटी या प्रकरणात वसुधा पाटील यांच्या कथेचे विवेचन केले आहे.

' जमुना के तीर ' आणि ' वेगळी ' हे दोन्ही कथासंग्रह नायिका प्रधान आहेत. ' माझे आईवडील ', ' आम्ही तिघं ' या शीर्षकाखाली येणारे लेखन कथेसारखे असले तरी ते काहीसं व्यक्तिचित्रणात्मक कांहीसे आठवणीसारखे वाटते. पहिल्या ' श्रीनिवास पानसेचे अंगण ' पासून शेवटपर्यंत एक गोष्ट जाणवत राहते. आणि ती म्हणजे लेखिकेचे जीवनविषयक श्रध्दाशील आणि भावनाशील मन स्त्री जीवनातील दु:खाना आजवर अनेकांनी ललितसाहित्यातून आकार दिला असेल पण ' वसुधा पाटील ' यांच्या कथा साकार होतात. त्या विलक्षण, निग्रही, मनस्वी तरुणींनी अमूर्त मूल्यांसाठी

केलेल्या संघार्षांतून ' मनू ' किंवा ' सुचेता ' या व्यक्ती साकार करताना त्यांच्या आवडी निवडी, त्यांचे संवाद, इत्यादी बारिक सारीक तपशिलातून त्यांचे व्यक्तित्व नेमके तयार करण्याचा प्रयत्न वसुधा पाटील यांनी केला आहे. भावनेने भारविलेल्या कांही जुन्या आठवणी, जुनी मूल्ये आणि जीवन यांचे चित्रदर्शी रेखाटन त्या करतात.

वसुधा पाटील यांना कलात्मकतेचे जितके भान आहे. तितकेच सामाजिकतेचे, सामाजिक जाणिवांचे आणि सामाजिकतेच्या संदर्भात व्यक्तिगत सुखदु:खाचे परिपूर्ण भान आहे. स्त्रीचा एकीकडून नियतीशी असणारा संबंध आणि दुसरीकडून जीवन व्यवस्थेशी असणारा संबंध आणि त्यातून होणारी माणसांची शोकांतिका हे सर्वच समर्थपणे व्यक्त करण्याचे सामर्थ्य वसुधा पाटील यांच्या निवेदनशैलीत आहे. प्रवाही निवेदनामुळे त्यांच्या कथा वाचनीय वाटतात. ' स्त्रीचे दैवच फरफट करीत असते ' या सूत्राचा प्रत्यय त्यांच्या कथांतून येतो. १९६० नंतर आशय आणि अभिव्यक्ती या दोन्ही दृष्टींनी मराठी कथेला जी जी नवी परिमाणे लाभली ती मिळवून देण्यात वसुधा पाटील यांचे कथालेखन – कर्तृत्व कारणीभूत ठरले.

' वसुधा पाटील यांना स्त्रीवादाची पूर्ण जाणिव आहे. म्हणून स्त्रियांच्यावर पितृसत्ताक समाजाने लादलेली बंधने झुगारून देऊन त्यांनी लेखन केले आहे. त्यांनी आपल्या कथेतून स्त्रीला ' आत्मविश्वासाची प्रेरणा ' ' निवडीचे स्वातंत्र्य ' , ' सत्याचा साक्षात्कार ', याची जाणीव करून दिली. एक स्त्री या नात्याने लेखिकेने स्त्रीचे कांही खास प्रश्न, समस्या अत्यंत तरल आणि हृदयस्पर्शी भावना रेखाटल्या आहेत. वाचकाला आपल्या कथेतून खेचून घेणारे, समकालीन परिस्थितीची आणि वास्तवाची जाणीव करून देणारे त्यांचे लेखन आहे. स्त्रीला केंद्रस्थानी ठेवून वाचकाला आत्मशोध घ्यायला व आत्म-परिक्षण करायला लावणारे आहे.

बदललेल्या नव्या जाणीवा आपल्या कथेतून मांडणाऱ्या एक प्रतिभावंत व सामर्थ्यशाली कथालेखिका म्हणून वसुधा पाटील यांचा उल्लेख करावा

लागेल. त्यांच्या कथेतील स्त्री आत्मनिर्भर वाटते. स्त्रीच्या बदललेल्या रूपाचा मागोवा आणि नवशिक्षित स्त्रीच्या मनाची जडणघडण व तिची सुख दु:खे यांचा वेध त्या घेतात.

वसुधा पाटील यांचे मन संवेदनशील व पारदर्शी असून श्रध्दाशील, भावूक आहे. कथेतील पात्रांच्या अनुषंगाने एखादा नवा विचार जो परंपरेला छेद देणारा असेल, किंवा व्यक्तिमनात होणारी सूक्ष्म हालचाल अचूक टिपण्याचे सामर्थ्य त्यांच्या लेखनशैलीत आहे. वसुधा पाटील मुळातच स्त्री लेखिका असल्यामुळे स्त्रियांचे जिवंत मनोविश्व उभे करण्यात त्या पुर्णपणे यशस्वी झाल्या आहेत. असे जाणवते. भावकुलीन स्त्रियांच्या प्रीतीची, त्यागाची, समर्पणाची, निष्ठेची आणि दिलदार, खानदानी अंत:करणाची काळाच्या ओघात जी विपरीत वाताहत होते. त्यांची नाट्यमय व आवेगी चित्रणे त्यांच्या कथातून आलेली आहेत. वसुधा पाटील यांची निवेदनपध्दती सांकेतिक वाटली तरी त्यांच्या कथा मात्र सांकेतिक बनत नाहीत. भावमधुर वृत्तीचा ताजेपणा आणि पारंध्रीचा बोज त्यांच्या कथेत आहे. असे असतानां देखिल मराठी समीक्षेने वसुधा पाटील यांच्या लेखनाची कांही अपवाद वगळता योग्य ती दखल घेतलेली जाणवली नाही. म्हणून ' जमुना के तीर ' आणि ' वेगळी ' या दोन कथासंग्रहांच्या अनुषंगाने त्यांच्या कथा वैशिष्टयांचा चिकित्सक अभ्यास या प्रबंधिकेत केला आहे.

मराठी लघुकथा वाङ्‌मयप्रकारातील स्त्री लेखिकांच्या कथांचे स्वरूप पाहात असतांना वसुधा पाटील यांचे मराठी कथेतील योगदान किती महत्वाचे आहे हे एकूण प्रबंधिकेच्या अभ्यासातून लक्षात येते.

## परिशिष्ट

### " वसुधा पाटील यांची मुंबई येथे घेतलेली प्रकट मुलाखत "

( श्रीमती वसुधा पाटील यांची एम्. फिल. शोध प्रबंधिकेसाठी मुंबई, गोरेगांव येथे त्यांच्या निवासस्थानी घेतलेली प्रकट मुलाखत. दि. ८ डिसेंबर१९९८)

१) मॅडम आपण बालपण आणि शालेयजीवनाविषयी कांही सांगू शकाल का ?

माझे बालपण व शालेय शिक्षण बांद्रा येथील विले पार्ले विद्यालयात इंग्रजी तिसरीपर्यंत, तर पुढील मॅट्रीकपर्यंतचे शिक्षण, अभिनोरेगांवकर इंग्लिश स्कूल गोरेगाव, मुंबई येथे पूर्ण झाले. माझे वडील हेडमास्तर होते. त्यांनाही वाचनाची आवड असल्यामुळे त्यांनी आणलेली सर्व पुस्तके आवडीने वाचत असे, माझ्या भावंडांनाही वाचनाची आवड असल्यामुळे नवनवीन पुस्तके घरी आणत आणि त्याचाही मला लाभ झाला. लहानपणीच माझ्या वडिलांनी आम्हांसाठी 'आनंद',' शालापत्रक' ही दोन मासिके चालू केली होती. 'स्त्री', किर्लोस्कर, 'चित्रमय जगत', ही नियतकालिके घरीच उपलब्ध असल्याने ती मी वाचून काढली.

शालेय जीवनात मासिक काढणे, चित्र काढणे, स्वत: कथा रचून भावंडांना सांगणे आणि आजी आजोबांना कथा वाचून दाखवणे त्या लहानपणीच्या माझ्या आवडीच्या गोष्टी होय.

२) आपण साहित्यलेखनाकडे कॅव्हा वळलात ? आणि ख-या अर्थाने कथा लेखनास प्रारंभ कधीपासून झाला ? लेखनास प्रेरणा कोणाच्या मिळाल्या ?

लहानपणापासूनच कथा वाचनाची आणि कथा रचून सांगण्याची आवड असल्यामुळे मी नकळतपणे कथा लिहित गेले. मी लिहिलेल्या कथा शाळेतील मुलांना आवडत असत. सर्वप्रथम माझ्या कथा १९४३ ते १९४७ पर्यंत शाळेतील मासिकांत प्रसिध्द होत होत्या, त्यानंतर ख-या अर्थाने माझी पहिली कथा १९५६ मध्ये 'वसुधा' मासिकात आली. विजय तेंडुलकरांनी मला कथा लेखनाला चैतन्य आणि

माझ्यात एक नवीन प्रेरणा निर्माण केली, त्यामुळे कथालेखनाचा उत्साह दुणावला. याचबरोबर ' मानिनी ', ' अनुराधा ', ' वसंत ', ' वाङ्मय-शोभा, ' प्रपंच ', इ. मासिकातून लेखन केले.

माझे मोठे बंधु पु. बा. सावंत 'सत्यकथा' तून लेखन करीत होते, याचाही परिणाम म्हणून ' सत्यकथा ' या मासिकात ' आम्ही तिघं ' हा पहिला ललित लेख राम पटवर्धन यांनी प्रसिध्द केला आणि तो लेख त्यांना खूप आवडल्याचे त्यांनी पत्राव्दारे कळवीले, त्यामुळे आपण ललित लेख लिहू शकतो ही नवी जाणीव माझ्यात निर्माण झाली. आणि सांगायचे म्हणजे जे ऐकलं जे वाचलं, आणि अनुभवलं तेच मी लिहित गेले.

३) आपण कथालेखिका म्हणून लिखाण करत असताना अन्य कोणत्या प्रकारचे लेखन केले आहे का ?

माझ्या कथा परिचीत होत होत्या, आवडतही होत्या, याच बरोबरीने मी अव्वल दर्जाच्या एकांकिका लिहिल्या, मी शिक्षिका असताना एकांकिका लिहून शालेय कार्यक्रमातून विद्यार्थ्यांकडून बसवून घेत असे. माझ्या ' पियानो ' या एकांकिका संग्रहाला महाराष्ट्र शासन पुरस्कार मिळाला, शिवाय ' सरहद्द ' धर्म, अनाथ या एकांकिका वाचनीय ठरल्या आहेत.

लहान मुलांसाठी ' सिंड्रेला ' हे नाटक व रंगतदार बारा नाटय-छटा, बालवाङ्मय लिहिले असून, 'मालवून टाक दिप', 'आगतिक', 'फक्त एक वर्ष तीन महिने' या कादंबऱ्या प्रसिध्द झालेल्या आहेत. याचबरोबर ' हिजडा ' या नपुंसक व्यक्तीच्या समस्येवर लेखन करण्याचे ठरविले, आहे. ' चूल आणि मूल ' एवढयाच क्षेत्रापूरतं लिहिण्यापेक्षा मला जेवढं सूचेल मग ते वास्तव असो वा काल्पनिक या विषयांवर मी लिहित आहे. आणि महत्वाचे म्हणजे कोणतंही साचेबंद लेखन मी केलं नाही.

४) आपणांस साहित्यलेखनास पतीचं सहकार्य लाभलं का ?

माझा विवाह १८ व्या वर्षी झाला. त्यापूर्वीपासूनच माझे लेखन सुरु होते. माझे पती एल.आय.सी. ऑल इंडिया कंपनीत युनियन लिडर असल्यामुळे त्यांचे क्षेत्रं साहित्यापासून वेगळ्या प्रकारचे होते. मुळातच त्यांना साहित्यामध्ये रस नसल्याने लेखनास मदत म्हणून कांही केले नाही. पण विरोधही केला नाही. युनियनमध्ये काम करताना एका दिडकीचीही अपेक्षा न करता प्रामाणिकपणे सामाजिक प्रश्न सोडविले त्यांच्या सतत सहवासामुळे माणुसकी, प्रामाणिकपणा याची जाणीव मला झाली. लेखनास जरी मदत झाली नसली तरी एक प्रामाणिक पती म्हणून त्यांच्याविषयी अभिमान वाटतो.

५) साहित्य लेखनाबरोबर आपण सामाजिक कार्यात सहभागी झाला आहात का ? असाल तर त्याविषयी आपले मत –

प्रथम शिक्षिका आणि मग लेखिका हे माझं लहानपणापासूनच स्वप्न होतं., शिक्षिका असताना ३४ वर्षांच्या सेवेत मुलांना चांगले संस्कार, चांगले विचार देऊन नवतरुण – भावीपीढीला घडविण्याचे एक सामाजिक कार्यच मी केले आहे.

मी एक स्त्री असल्यामुळे स्त्रीचं दु:ख , तीची समाजात होणारी होरपळ, कुचंबणा जवळून पाहिली आणि अशा स्त्रियाना स्थान मिळावं म्हणून मी त्यांच्या वेदना मुखर करण्याचा प्रयत्न केला. मुलांच्या शालेय कार्यक्रमासाठी स्वखर्चाने उपस्थित राहत असे. आणि जे कांही माझे थोडके उत्पन्न होते. त्यातील कांही रक्कम मी सामाजिक संस्थांना निधीच्या स्वरुपात सढळ हाताने मदत करते.

६) आपल्या साहित्यावर टिका झाली आहे का ? असेल तर त्याविषयी आपले मत काय ?

मी स्त्री कथालेखिका असले तरी सुध्दा मला एकूणच समाजांतील घटकांवर प्रकाश टाकावा वाटला, प्रखरपणे विचार करून मी स्त्री-पुरुष असा भेद न करता माझ्या साहित्यातून त्यांच्या समस्या मांडल्या म्हणून पुरुष वाचकवर्गाने माझ्यावर आरोप केला. ज्यावेळी ' धर्म ' सारखी गुप्त रोगावर एकांकिका लिहिली. त्यावेळी " माझ्या लेखनावर कडाडून टिका करताना अत्रे म्हणाले की, बाईचे डोके ठिकाणावर नसून ते नरकात फेकले गेले आहे. त्यांचा मेंदू सडका आहे ", तसेच केशव केळकर नभोवाणी दूरदर्शनचे डायरेक्टरांनी मला तुम्हांला कोणताच पुरुष चांगला दिसत नाही का " असा प्रश्न केला, आणि वेश्यांवर लेखन केले. त्यावेळी मला पुरुषी लेखिका आणि घाणेरडे, अश्लिल लिहिणारी लेखिका म्हणून माझ्यावर आरोपही केले गेले.

७) मॅडम शेवटचा प्रश्न असा की, ' जमुना के तीर ' व ' वेगळी ' या कथासंग्रहाबद्दल आपले मत काय ?

माझ्या जीवनातील वास्तव अनुभव मी या दोन संग्रहातील कांही कथातून मांडले आहेत. त्यातील ' श्रीनिवास पानसेचे अंगण ' ही माझी आवडती कथा आहे. ' जमुना के तीर ' ही कथा रुस्तुम अचल खाँ ची रेकॉर्ड ऐकूनच मी कथा लिहिली आहे. ही कथा श्री. ह. वी. मोटे यांना आवडली. त्यांनीच या कथासंग्रहाला ' जमुना के तीर ' हे शिर्षक दिले. ' आम्ही तिघं ' हा ललित लेख असून माझ्या लहानपणीच्या तीन भावंडांचं चित्रण त्यात केले. ' माझे आईवडील ' या कथेत आठवणी व्यक्त केल्या आहेत. ' न्यूड ' या कथेत मी माझ्या आर्टमास्तरच्या वेळच्या व्यक्तिगत अनुभव रेखाटला तर ' सुचेता ' या मैत्रिणीच्या जीवनात

घडलेल्या घटनेवर आधारित कथा आहे. कथा लिहिताना पात्र ठरलेली असतात. सुरुवात मात्र ठरलेली नसते, पण मला इथे जाऊन पोहचायचे आहे असा शेवट मात्र ठरलेला असतो. त्यामुळे कथासंग्रहातील कोणत्याही कथा ठरवून व साचेबंद लिहिल्या नाहीत, माझा देवाधर्मावर विश्वास नाही. जातीधर्म मानन‌ं आवडत नाही. देवाधर्माच्या पायीच जाती निर्माण होऊन समाजाची शकले उडाली आहेत. याचं उत्तम वर्णन ' वेगळी ' कथा संग्रहातील ' भिंती ' या कथेतून केले आहे.

## संदर्भ ग्रंथ



| अ. नं. | लेखकाचे नांव | ग्रंथ व नियतकालिके |
|---|---|---|
| १) | कुलकर्णी अनिरुध्द अनंत | 'प्रदक्षिणा' खंड पहिला<br>सहावी आवृत्ती–१९७९<br>कॉन्टिनेन्टल प्रकाशन<br>विजया नगर, आंबिल ओढा,<br>पुणे–४११ ०३०. |
| २) | प्रा. कुलकर्णी दा. वि. | मराठी कथा स्वरुप आणि आकार<br>प्र. आ. जून १९७६<br>स्वाधाय महाविद्यालय प्रकाशन,<br>५९७, सदाशिव पेठ,<br>पुणे. |
| ३) | कुलकर्णी वा. ल. | वाङ्मयीन दृष्टी आणि दृष्टीकोन<br>प्र. आ. १९५९<br>पॉप्युलर प्रकाशन, मुंबई–७. |
| ४) | कुलकर्णी मधू | ललित साहित्याची जडणघडण<br>शुभदा सारस्वत पब्लिकेशन्स,<br>प्रा. लि., पुणे–५. |
| ५) | क–हाडे सदा | ललित – मे, १९७८. |
| ६) | गाडगीळ गंगाधर | खडक आणि पाणी<br>तिसरी आवृत्ती – फेब्रुवारी १९८५<br>उत्कर्ष प्रकाशन<br>२७३, शनिवार पेठ, पुणे–४११ ०३० |
| ७) | डॉ. जोशी प्र. न. | आदर्श मराठी शब्दकोश<br>प्र. आ. १९७०<br>विदर्भ मराठवाडा बुक कंपनी<br>शुक्रवार पेठ, पुणे–२ |
| ८) | डॉ. जोगळेकर ग. ना. | महाराष्ट्र साहित्य पत्रिका<br>ऑगस्ट १९९१. |

| अ.नं. | लेखकाचे नांव | ग्रंथ व नियतकालिके |
|---|---|---|
| ९) | देशपांडे अ.ना. | आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग – दुसरा, प्र.आ. १९५८, पुनर्मुद्रण–जाने, १९७९ व्हीनस प्रकाशन, ३८१,'क' शनिवार पेठ–४११०३०. |
| १०) | दावतर वसंत केशव (संपा.) | आलोचना – अंक दुसरा, ऑक्टो–१९७२. |
| ११) | डॉ. देशपांडे वि.भाग (संपा) | मराठी भाषा आणि साहित्य, प्र.आ. सप्टेंबर, १९९० मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६, सदाशिव पेठ, पुणे–४११०३०. |
| १२) | पवार गो.मा. (संपा.) | मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप प्र.आ. १९०७, पॉप्युलर प्रकाशन प्रा.लि., ताडदेव मुंबई –४०० ०३४. |
| १३) | फडके भालचंद्र | मराठी लेखिका: चिंता आणि चिंतन प्र.आ. मार्च १९८० श्री विद्या प्रकाशन २५०, अष्टभुजा मार्ग शनिवार पेठ, पुणे–४११०३०. |
| १४) | फडके ना.सी. | लघुकथा लेखन मंत्र आणि तंत्र प्र.आ. ऑगस्ट, १९५२ व्हीनस प्रकाशन, पुणे. |
| १५) | फडके ना.सी. | प्रतिभासाधन –१९३१ |
| १६) | डॉ. यादव आनंद | ग्रामीण साहित्य:स्वरूप आणि समस्या व्दितीयावृत्ती–१९८४ मेहता पब्लिशिंग हाऊस सदाशिव पेठ, पुणे–४११०३०. |

| अ. नं. | लेखकाचे नांव | ग्रंथ व नियतकालिके |
| --- | --- | --- |
| १७) | डॉ. वडेर प्रल्हाद | आशय आणि अविष्कार<br>प्र. आ. मार्च-१९८८<br>मेहता पब्लिशिंग हाऊस,<br>१२१६, सदाशिव पेठ, पुणे-४११०३०. |
| १८) | शेवडे इंदुमती | मराठी कथा उगम आणि विकास<br>सोमया पब्लिकेशन्स प्रा. लि.,<br>मुंबई<br>दिल्ली-१९७३. |
| १९) | डॉ. सोमण अंजली | साहित्य आणि सामाजिक संदर्भ<br>प्र. आ. -१९८९<br>प्रतिभा प्रकाशन,<br>१३५९, सदाशिव पेठ,<br>पुणे-४११०३०. |
| २०) | डॉ. सोमण अंजली | मराठी कथेची स्थितिगती<br>प्र. आ. १९९५<br>प्रतिभा प्रकाशन,<br>१३६२, सदाशिव पेठ, पुणे-४११०३०. |
| २१) | डॉ. सन्त जान्हवी | अर्वाचीन साहित्य समालोचन<br>तृतीयावृत्ती जाने १९९०<br>विठ्ठल निवास,<br>मलकापूर (कोल्हापूर)-४१५१०१. |
| २२) | हातकणंगलेकर म. द. | मराठी कथा : रूप आणि परिसर<br>प्र. आ. मार्च १९८६<br>सुपर्ण प्रकाशन,<br>१५५२, चिमणबाग,<br>सदाशिव पेठ, पुणे-४११०३०. |


...